**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF PROPOSED EXPANSION PROJECT OF MANGANESE MINE FROM 1160 TPA TO 25757 TPA AND MINING PROJECT OF QUARTZ MINERAL 270000 TPA, MINE LEASE AREA 24 HAECTOR OF M/S. SHUBHNAM MINERALS ENTERPRISES, SURVEY NO.96, 97 VILLAGE KOTHULNA, TAH-SAONER, DIST.NAGPUR DTD. 28/06/2022.**

As per Ministry of Environment and Forest, Govt. of India Notification dated 14.09.2006 amended notification dated 1.12.2009. M/s. Shubhnam Minerals Enterprises, S.No.96, 97, Village-Kothulna, Tah-Saoner, Dist-Nagpur applied for Environmental Public Hearing in respect of Proposed Expansion Project of Manganese Mine from 1160 TPA To 25757 TPA and Mining Project of Quartz Mineral 270000 TPA, Mine Lease Area is 24 Héctor. Said public hearing is conducted at Project Site, Survey No. 96, 97, Village Kothulna, Tah-Saoner, Dist.Nagpur under the Chairmanship of Hon'ble Smt. Vijaya Bankar, Additional District Magistrate & Resident Deputy Collector. Shri. Ashok Kare, Regional Officer, M.P.C.Board, Nagpur was the member of the public hearing panel, attended through online mode and Shri. Umashankar Bhadule, Sub-Regional Officer, M.P.C.Board, Nagpur-I acted as convener. The Public Hearing started at 12.00 noon with the permission of the Chairperson of the Public Hearing Panel. Attendance of the People present during the Public Hearing is attached as **Annexure-I.**

**BACKGROUND :**

The report has been prepared for the Environmental Impact Assessment of the expansion in production capacity for Manganese in Kothulna Manganese Mine of M/s. Shubhnam Minerals Enterprises from 1160 TPA to 25757 TPA & production of Quartz mineral 270000 TPA (Max) within the existing mine lease area of 24.0 Ha. Located in Kothulna Village, Tah-Saoner, Dist Nagpur in accordance with the Notification of MoEF&CC S.O.1533 dated 14.09.2006 under the sub rule (3) of Rule 5 of the Environment (Protection) Rules, 1986 which imposes certain restrictions and prohibitions on new projects or activities, or on the expansion or modernization of existing projects or activities based on their potential environmental impacts as indicated in the Schedule to the notification, being undertaken in any part of India, unless prior environmental clearance has been accorded.

Manganese ore is mostly used in steel plants, Ferro-Manganese plants and Manganese based chemicals & compounds for various applications. The high manganese steel is very hard and resistant to wear and tear and is used for making rock crushers, rail, road armor plates and burglar proof safes. It is also used in dry batteries, animal feed and paint industries. During preparation of the final EIA/EMP, it has been noticed the project is located at distance 6.85 km from Mansingdeo Wildlife Sanctuary. As such the general conditions of the EIA Notification dtd. 14th September 2006 does not apply to this project. As far as Eco Sensitive Zone (ESZ) issue is concerned, the ESZ Draft Notification was issued on 17th March 2016 and final ESZ Notification was issued on 13th September 2017.

..2/-

A suitable environment management plan to ensure environment-friendly mining has also been drawn. Report prepared in accordance with the generic structure of an EIA document includes project description, base line environmental quality data of core zone (ML Area 24.0 Ha) and buffer zones of 10 km radius, anticipated impacts and their mitigation measures as well as an Environment Management Plan.

**PURPOSE AND PROCEDURE:**

With the permission of Chairperson of Public Hearing, the Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-I & Convener started Public Hearing by welcoming the Chairperson and Member of the public hearing panel, local citizens from the village and others.

The Chairperson of Public Hearing Panel informed that, the Public Hearing is conducted for recording the views/objects/suggestions of the participants regarding the project, and same is communicated to the Government. Chairperson also clarified that this panel is not here to take decision for accordance of any approval to the project and appealed the participants to express their views and suggestion.

Convener & Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-I explained the purpose of conducting this public hearing stating that as per MoEF, GOI Notification SO 60(E) of 27th January, 1994 and amended on 14th September, 2006 & amendment thereof, the notice for the public hearing was published in two local widely circulated Newspapers i.e. the 'The Times of India' (English) and 'Lokmat' (Marathi) on 23.05.2022. Copies of the same are enclosed as **Annexure-II.** Copies of the executive summary / EIA containing salient features of the project & EIA both in English and in Marathi and other information/documents were made available to the public by making these documents available in various Govt. offices as well as local Gram Panchayat, as per MoEF GOI Notification. Suggestions, comments and objections of the public were called in writing during the notice period after the publication of the notice. The public hearing panel was constituted vide MPC Board Office Order No. E42/2022 vide letter No. BO/JD/(WPC)/PH/B-220617-FTS-0080 dtd. 17/06/2022. Copy of the same is enclosed as **Annexure-III.** However, representations on email were not received. This office has received 3 representation letters regarding proposed project, copies are enclosed as per **Annexure-IV.**

Thereafter, Sub-Regional Officer, Nagpur-I & Convener requested the project proponent to give their detail presentation about the project and the Environmental issues related with it. Accordingly, representative of the project explained in detail in Marathi language the power point presentation of the project as under.

..3/-

*Project undertaken by M/s. Shubhnam Minerals Enterprises, s.No.96, 97, Vill.Kothulna, Tah-Saoner, Dist-Nagpur for Proposed Expansion of Manganese Mine From 1160 TPA To 25757 TPA and Mining Project of Quartz Mineral 270000 TPA. Mine Lease Area 24 Héctor. He further explained regarding project location, benefits of proposed project, proposed facilities, fire fitting facilities, process description, description of environment and identification of anticipated impact, Land environment, climate and meteorology, Air Environment, existing water quality, water consumption, biological environment, socio-economic environment, impact on local infrastructure, environment management plan, air emission, preventive maintenance / inspection.*

Sub-Regional Officer & Convener Shri. U.B. Bhadule requested the citizens as well as the present public to express their views, comments, concern & suggestion for this proposed project.

**FOLLOWING MEMBERS HAVE PARTICIPATED IN PUBLIC HEARING AND RAISED QUESTIONS/COMMENTS/SUGGESTIONS. THE DETAILS ARE GIVEN BELOW;**

**1) Shri. Harish Dhanraj Chaudhary, Sarpanch, G.P. Kothulna**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | In the area of Kothulna village, various environmental activities such as tree plantation and its maintenance & guarding should be done by the company. | In order to beautify the villages and to protect the environment, tree plantation, their maintenance, guarding & various other activities will be organized by the company. |
| 2. | A large number of trees should be planted on the side of the road and tree guards should be provided. | The land in the mining area will be flattened and developed as a green belt. For the protection of trees tree guards will be installed on the trees after plantation. Trees will be planted on both sides of the road and in open spaces. |
| 3 | Quarry water should be made available to the farmers in the surrounding area for farming. The depth of the quarry should not be too much, so that the ground water level is not affected. Also, water should be supplied through tankers in the villages. | Water will be supplied to the village by tanker. The depth, width and length of the mine area is as per the Mine Plan approved by the Indian Bureau of Mines. The plan is renewed every 5 years & It will be renewed in 2024. |

| | | |
|---|---|---|
| 4 | Noise pollution is caused also stones fall on roofs of houses due to blasting in mines. Therefore, financial assistance should be provided by the company in case of loss of life. Low power blasting should be done. | As per the guidelines published by the Indian Bureau of Mines & as per the conditions in the approved mine plan-controlled blasting is carried out. Even further vigilance, care will be taken in future also. Financial assistance will be provided by the company in case of damage to houses if caused due to falling stones. |
| 5 | Roads should be strengthened by putting soil on the side of the road leading to the village and farm. | Road leading to villages and farms will be strengthened, tarred by the company. |
| 6 | Health camps, sports equipment should be provided to the citizens of the villages as well as playgrounds should be developed. Please provide CER information. | Health camps, sports equipment will be provided, and playgrounds will be developed by the company. |
| 7 | Locals should be employed as computer operators or security guards. | Locals will be given preference in employment. Technical training will be facilitated. |

**2) Shri. Ajay Chaudhary, Member, GP Kothulna.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | The existing project is causing air pollution and the company has not complied with the air pollution regulations. Also, the expansion of the project will cause dust emissions. | For air pollution control, water will be sprayed in the area and on the surrounding roads. Trees will be planted on both sides of the road. |
| 2. | The road leading to the village has deteriorated in the last 15 years. Traffic movement spreads dust in the area. Water is not sprayed regularly. No trees have been planted along the road. | The representatives of the company gave a verbal assurance to the public that regular water spraying would be done on the roads. |
| 3 | There are not many jobs for the locals and there is no benefit from the project. There is trouble with expansion. | Locals will be given preference in employment |
| 4 | Locals did not get employment. Trees should be planted. | The representatives of the company gave a verbal assurance to the public that local people will be given priority in employment and trees will be planted. |
| 5 | Kothulna villages have not been given CER funds. How much funding has the company provided from the CER fund for Kothulna villages in the last 15 years? | CER funds will be spent to implement various activities in nearby villages in the location area. These include health camps, tree plantation, road repairs etc. Social work will be done. |

3) **Shri. Balaji Nagorao Dadne, Up-Sarpanch, GP Kothulna**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | The transportation of minerals causes dust emissions problems. The company should control this, spray water. Farmers also suffer from dust. | Mining & transportation will not be done during night. The truck carrying the material will be covered with tarpaulin. Trees will be planted along the road. |

4) **Shri. Narendra Lanjewar, Sarpanch, GP Umari.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1 | Care should be taken to ensure that people do not suffer from pollution from the proposed project. New trees should be planted. The company has covered 10 km. CER funds should be used for the development of villages in the area. | The company agreed to plant trees and distribute CER funds for the development of villages in the area. |

5) **Shri. Lalit Chaurawar, Sarpanch, G.P. Kirnapur**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | There is a village at a distance of 500 meters and the houses in the villages are shaken due to blasting. Barricading shall be provided along roadsides, which is necessary mostly during mining work. Also, a road should be constructed to go to Kothulna village. | The road passing near the quarry will be asphalted, potholes will be filled, regular water spraying will be done, trees will be planted on the side of the road. Also, Barricading will be provided along roadsides. |
| 2 | School children suffer from dust while walking on roads. For that, the company should repair the road leading to the village using muroom, excavated soil. | Repairing, tarring & regular water spraying will be done on the roads to control dust emissions. |
| 3 | Low power blasting method should be used. Safety fences should be installed on both sides of the road leading to the mine. | Proper and safe blasting will be done. Barriers will be installed in the mining area during the excavation work. Roads in the mining area will be regularly repaired. |

6) **Shri. Sanjay Satyakar, Ramtek Assembly Constitution.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Government roads in Kothulna villages are in a bad condition. The quarry road is adjacent to the road leading to the village. What should be the distance of the quarry from the road? The mine is 90 feet deep. Also, security fencing should be done on all four sides of the mine pit. | Mining operations and cargo transportation will be done as per the terms and conditions of the Mine Plan approved by the Indian Bureau of Mines. A survey will be conducted for possible alternative roads. Also, a security fence will be installed on all four sides of the quarry. |
| 2 | The company has not provided CER funds to Kothulna village till date. How many people will be employed in the proposed project? This information should be given to the locals in written form. CER funds should be utilized for the development of villages in the area. The company has not conducted a health camp in the village in the area. | CER Fund information will be provided in written form. CER funds will be used to develop villages in the area. Also, health camp, tree plantation, road repair etc. Social work will be done. |
| 3 | Provide information whether the National Park is 10 km from the proposed project. | Information regarding distance of National Park from proposed project will be provided. |
| 4 | The existing company has dug pits of approximately 200 feet depth and has not erected a barricade wall for animals and this may pose a threat to wildlife. The ground water level in the area has gone down. The soil released from the excavation goes into the drain. | A security fence will be installed on all four sides of the quarry. The excavated soil will be used to fill the road potholes and the excess soil will be stored in a designated area as per the approved plan. Care will be taken that the soil does not go into the drain. Rainwater harvesting will be done to increase the ground water level. |
| 5 | Kothulna village is inhibited by tribals and no social commitment survey has been conducted by the company. | Health camp, tree plantation, road repair etc. Social work will be done in villages. |
| 6 | Existing quarries are causing damage to agriculture in the area due to dust. The company should pave the road leading to the village. There is no opposition to the expansion project. | Roads will be repaired for dust control, water will be sprayed on the roads, transport trucks will be covered with tarpaulin, etc. Measures will be taken. |
| 7 | What is the allocation of funds for tree plantation in the proposed project? Only Rs. 3 lakh per annum for tree plantation and Rs. 50,000/- per annum is spent on tree conservation, which is not sufficient. More trees should be planted in the area. | Fund information will be given for tree plantation. Adequate funds will be used for tree plantation. Plantation of trees will be done in abundance. |

7) Smt. Jayshri Somkuwar, Villager

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Houses in Kothulna villages suffer from dust particles at night, because of the possibility of accidents, the company should install streetlights on village roads. | Mining will not be done at night. The company will install streetlights on village roads. |

8) Shri. Govindlal Vikhe, Villager

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Dust particles causes trouble, stones should not fall on houses in villages due to blasting. The road leading to the school children passes through the thick forest. A separate road should be made for the people of the villages. | Roads will be repaired, roads will be sprayed with water, transport trucks will be covered with tarpaulin for dust control. Blasting will be done in low power and in controlled manner. A survey will be done for a separate road. |

**Shri. U.B.Bhadule, Convener & SRO, MPCB, Nagpur-I.**

He said that, project proponent should scrupulously follow the terms and conditions imposed in consent of MPCB. Project proponent shall full-fill the above mentioned commitments to solve the problems of the people before expansion work starts.

**Hon'ble Smt. Vijaya Bankar, Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Nagpur & Chairperson of Public Hearing Panel.**

She summarized the questions and queries raised by the people present for public hearing and the replies given by project proponent. Chairperson suggested that, the project proponent shall provide adequate employment to the local residents, large scale tree plantation drive shall be taken, and project proponent shall under take latest measure and latest technology and shall install up to date pollution control arrangements.

Sub-Regional Officer, MPCB, Nagpur extended vote of thanks to the present public and public hearing concluded with a vote of thanks to the chair.

| | | |
|---|---|---|
| **(Umshankar B. Bhadule)**<br>**Sub-Regional Officer-I,**<br>**MPC Board, Nagpur &**<br>**Convener of the Public Hearing Panel** | **(Ashok Kare)**<br>**Regional Officer,**<br>**MPC Board, Nagpur &**<br>**Member of the Public Hearing Panel** | **(Vijaya Bankar)**<br>**Additional District Magistrate &**<br>**Resident Deputy Collector,**<br>**Nagpur & Chairperson of the Public Hearing Panel** |

**मे.शुभनाम मिनरल्स इंटरप्रायजेस या कंपनीद्वारे सर्व्हे नं. ९६, ९७ ग्राम-कोथुळना, ता.सावनेर, जि.नागपूर मॅगनिजचे वाढीव उत्पादन करणे ११६० टन प्रतीवर्ष ते २५७५७ टन प्रतीवर्ष व क्वार्टचे खनन करणे २७०००० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. २८/०६/२०२२.**

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ मे.शुभनाम मिनरल्स इंटरप्रायजेस या कंपनीद्वारे सर्व्हे नं. ९६, ९७ ग्राम-कोथुळना, ता.सावनेर, जि.नागपूर मॅगनिजचे वाढीव उत्पादन करणे ११६० टन प्रतीवर्ष ते २५७५७ टन प्रतीवर्ष व क्वार्टचे खनन करणे २७०००० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २८/०६/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्पाचे स्थळ, सर्व्हे नं. ९६, ९७, ग्राम-कोथुळना, ता.सावनेर, जि.नागपूर येथे श्रीमती. विजया बनकर, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते व श्री.उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१).**

**पार्श्वभूमी**

मे.शुभनाम मिनरल्स इंटरप्रायजेस यांच्या गांव कोथुलना, तालुका सावनेर, जि.नागपूर येथील २४.० हे. च्या खाण लिज क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या कोथुलना मॅगनिज खाणीमधुन मॅगनिजची उत्पादन क्षमता ११६० टन प्रतीवर्ष ते २५७५७ टन प्रतीवर्ष पर्यंत विस्तारीकरणाचे व क्वार्टज मिनरल्सच्या २७०००० टन प्रतीवर्ष (कमाल) उत्पादनाचे पर्यावरणीय आघात मुल्यांकनाकरीता अहवाल तयार केला गेला आहे. MoEF&CC S.O. १५३३ दिनांक १४/०९/२००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ च्या नियम ५ च्या उप-नियम (३) अंतर्गत नविन प्रकल्प किंवा उपक्रम किंवा विस्तारीकरणावर आधारित किंवा विद्यमान प्रकल्पाचे आधुनिकीकरण किंवा संभाव्य पर्यावरणीय आघातावर आधारित उपक्रम अशा उपक्रमांना काही प्रतिबंध व निर्बंध लागू केले आहे, जे अधिसूचनेच्या सारणीमध्ये नमूद केले आहे,

मॅगनिज ओर प्रामुख्याने स्टिल प्लांट, फेरो मॅगनिज प्लांट व मॅगनिज आधारीत रासायनिक व विविध वापराकरिता मिश्रणामध्ये वापरले जाते. उच्चतम मॅगनिज स्टिल अतिशय कठोर असतो आणि झीज प्रतिरोधाक असतो व खडक क्रशर, रेलमार्ग, चिलखत प्लेटस आणि सुरक्षा साधने तयार करण्यात वापरल्या जातो. हे कोरड्या बॅटरी, पशुखाद्य आणि पेंट उद्योगांमध्ये देखील वापरले जाते. प्रकल्प मानसिंगदेव, वन्यजीव अभयारण्या पासून ६.८५ कि.मी. अंतरावर आहे. जिथपर्यंत इको संवेदनशील झोन (ESZ) मुद्दयांचा संबंध आहे. ESZ ड्राप्ट (मसुदा) अधिसूचना १७ मार्च २०१६ ला जारी केली होती आणि १३ सप्टेंबर २०१७ ला अंतिम ESZ अधिसूचना जारी करण्यात आली. हा अहवाल EIA अहवालाच्या सर्वसामान्य आराखड्यानुसार तयार करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये प्रकल्पाचे वर्णन, कोर झोन (ML क्षेत्र २४.० हे.) आणि १० कि.मी. त्रिजेच्या बफर झोनच्या पायाभूत पर्यावरणीय गुणवत्तेची माहिती, संभाव्य आघात व त्यांचे उपशमन उपाय तसेच पर्यावरणीय व्यवस्थापन योजना समाविष्ट आहे.

..२/-

**<u>प्रयोजन व कार्यपध्दती:-</u>**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या EIA अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे सांगितले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २३/०५/२०२२ ला दैनिक द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन वृत्तपत्रात पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२)**.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण ३ आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले आहे. मंडळाचा आदेश क्र. ई-४२/२०२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-220617-FTS-0080 dtd.17/06/2022 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. **(सहपत्र-३)**. सुनावणी दरम्यान एकुण ३ निवेदने प्राप्त झाली असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे. **(सहपत्र-४)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत मॅगनिजचे वाढीव उत्पादन करणे ११६० टन प्रतीवर्ष ते २५७५७ टन प्रतीवर्ष व क्वार्टचे खनन करणे २७०००० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्यास आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री.हरिश धनराज चौधरी, सरपंच, ग्रामपंचायत, कोथुळना.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कोथुळना गावाच्या परिसरात पर्यावरणाचे विविध उपक्रम करावे जसे की, वृक्ष लागवड व त्याचे संगोपन कंपनीद्वारे करावे. | गावांमध्ये सौदंर्यीकरणाच्या दृष्टीने व पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षलागवड व त्यांचे संगोपन तसेच इतर विविध उपक्रम कंपनीद्वारे आयोजीत केले जातील. |
| २ | मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या बाजुला वृक्ष लागवड व ट्रि गार्डची सुवीधा करावी. | खाण परिसरातील जमीन सपाट करून त्यावर हरितपट्टा विकसीत केला जाईल. वृक्षांच्या संरक्षणाकरिता वृक्षारोपन करून वृक्षांना ही ट्री गार्ड लावण्यात येतील. रस्त्याच्या दोन्ही बाजुला व खुल्या जागेत वृक्षलागवड व त्यांचे संगोपन करण्यात येईल. |
| ३ | खदानीचे पाणी आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना शेती करण्याकरीता उपलब्ध करून दयावे. खदानीची खोली जास्त नसावी, जेणेकरून भूजल पातळी प्रभावित होणार नाही. तसेच गावांत टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा. | गावांत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल. भारतीय खान ब्युरो यांनी मंजुर केलेल्या खदान योजना (Mine Plan) प्रमाणे खदानीची खोली, रूंदी व लांबी आहे. दर ५ वर्षांनी सदर योजनेचे नुतनीकरण केले जाते. पुढे सन २०२४ मध्ये नुतनीकरण करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ४ | खाणीमध्ये ब्लास्टींगमुळे ध्वनी प्रदूषण होवून दगड घराच्या छतावर पडतात. त्यामुळे जिवित हानी झाल्यास कंपनीकडुन आर्थिक सहाय्य देण्यात यावे. कमी शक्तीचे ब्लास्टिंग करावे. | भारतीय खान ब्युरो द्वारा जाहिर केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे, मंजुर केलेल्या खदान योजनेमधील अटींप्रमाणे नियंत्रीत विस्फोट करण्यात येतात. या पुढे देखील संपुर्ण दक्षता घेण्यात येईल. घरांवर दगड पडल्यामुळे क्षती झाल्यास त्याकरीता आर्थीक सहाय्य कंपनीद्वारे देण्यात येईल. |
| ४ | गावात व शेतामध्ये जाणाऱ्या पादंन रस्त्याच्या बाजूला मुरूम टाकुन रस्त्यांचे मजबुतीकरण करावे. | गावात व शेतामध्ये जाणाऱ्या पादंन रस्त्याच्या बाजूला मुरूम टाकुन रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येईल. |
| ५ | गावांतील नागरीकांसाठी आरोग्य शिबिर, क्रिडा साहित्य तसेच खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्यात यावे. CER ची माहिती दयावी. | गावांतील नागरीकांसाठी आरोग्य शिबिर, क्रिडा साहित्य तसेच खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्यात येईल. |
| ६ | स्थानिकांना संगणक चालक किंवा सुरक्षा रक्षक म्हणुन रोजगार देण्यात यावा. | स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य देण्यात येईल. तांत्रिक प्रशिक्षणाची सोय करण्यात येईल. |

**२) श्री. अजय चौधरी, ग्रा.पं.सदस्य कोथुळनाा.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान प्रकल्पामुळे हवेचे प्रदुषण होत असुन कंपनीने हवेच्या प्रदूषणाचे नियमाचे पालन केलेले नाही. तसेच प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे धुळीचा त्रास होणार आहे. | वायु प्रदूषण नियंत्रणाकरीता स्थान परिसरात व सभोवताली रस्त्यांवर पाण्याची फवारणी करण्यात येईल, रस्त्याच्या बाजुला पाण्याची फवारे लावण्यात येईल. रस्त्यांच्या दोन्ही बाजुस वृक्षारोपण करण्यात येईल. |
| २ | मागील १५ वर्षात गावात जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. वाहतुकीमुळे परिसरात धुळ पसरते. पाण्याची फवारणी नियमितपणे होत नाही. रस्त्याच्या बाजुला वृक्ष लागवड केलेली नाही. | रस्त्यांवर नियमित पाण्याची फवारणी करण्यात येईल अशी मौखिक ग्वाही कंपनीच्या प्रतीनिधींना लोकांना दिली. |
| ३ | रोजगार जास्त स्थानिकांना लोकांना नाही व प्रकल्पापासुन फायदा काही नाही. विस्तारीकरणापासुन त्रासच आहे. | स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य देण्यात येईल. |
| ४ | स्थानिकांना रोजगार मिळाला नाही. वृक्ष लागवड करायला पाहिजे. | स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य देण्यात येईल व वृक्ष लागवड करण्यात येईल. |
| ५ | कोथुळना गावांला CER फंड दिलेला नाही. मागील १५ वर्षात कंपनीने कोथुळना गावांसाठी CER फंडातुन किती निधी दिलेला आहे. | खान क्षेत्रातील जवळपासच्या गावांमध्ये विविध उपक्रम राबविण्याकरीता CER निधी खर्च करण्यात येईल. यामध्ये आरोग्य शिबीर, वृक्ष लागवड, रस्ते दुरूस्ती इ. सामाजिक कार्य करण्यात येईल. |

३) श्री. बालाजी नागोराव दडणे, उप-सरपंच, ग्रा.पं.कोथुळना

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | खनिजाच्या वाहतुकीमुळे धुळीचा त्रास होतो. यावर कंपनीने नियंत्रण करावे, पाण्याची फवारणी करावी. तसेच शेतकऱ्यांना सुध्दा धुळीचा त्रास होतो. | खनन कार्य रात्रीच्या वेळी केले जाणार नाही. सामग्री वाहून नेणाऱ्या ट्रकला ताडपत्रीने आच्छादित केले जाईल. रस्त्याच्या बाजुल वृक्षारोपण करण्यात येईल. |

४) श्री. नरेन्द्र लांजेवार, सरपंच, ग्रा.पं.उमरी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे लोकांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. नवीन वृक्ष लागवड करावी. कंपनीने १० कि.मी. परिसरातील गावाच्या विकासाकरीता CER फंड चा उपयोग करावा. | कंपनीने वृक्ष लागवड करणे व CER फंड वितरीत करण्याचे मान्य केले. |

५) श्री. ललित चौरावार, सरपंच, ग्रा.पं. किरणापूर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ५०० मीटर अंतरावर गांव आहे व ब्लास्टींगमुळे गावांतील घरांना हादरे बसतात, खोदकाम करतांना रस्त्याच्या बाजुला कठडे लावावे. तसेच कोथुळना गावात जाण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करावे. | खदानी जवळून जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येईल, खड्डे बुजविण्यात येईल, नियमित पाण्याची फवारणी करण्यात येईल, रस्त्याच्या बाजुला वृक्षलागवड करण्यात येईल. तसेच खोदकाम करतांना रस्त्याच्या बाजुला कठडे लावण्यात येतील. |
| २ | शाळेतील मुलांना रस्त्यांनी जातांना धुळीकणांचा त्रास होतो. त्याकरीता कंपनीने मुरूम, काढलेल्या मातीचा वापर करून गावाला जाणारा रस्ता व्यवस्थित करून यावा. | धुळ प्रदूषण नियंत्रणाकरिता रस्त्यावर नियमित पाण्याची फवारणी करण्यात येईल. |
| ३ | कमी शक्तीचे ब्लास्टिंग पध्दतीचा वापर करावा. खदानीच्या बाजुने जाणाऱ्या वाहतुकीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस सुरक्षा कठडे लावावे. | योग्य व सुरक्षित ब्लास्टिंग केली जाईल. उत्खनन कार्याच्या वेळी खनन परिसरात अवरोधक लावण्यात येतील. खाण परिसरातील रस्त्याची नियमित दुरूस्ती करण्यात येईल. |

६) श्री. संजय सत्यकार, रामटेक विधानसभा क्षेत्र

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कोथुळना गावांतील सरकारी रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. खदानीचे रस्ते गावाला जाणाऱ्या रस्त्याला लागुन आहे. रस्त्यापासुन खदानीचा अंतर किती असायला पाहिजे. खदान ९० फुट खोल आहे. तसेच गड्डयाच्या चारही बाजूला सुरक्षा कुंपन करावे. | भारतीय खान ब्युरो यांनी मंजुर केलेल्या खदान योजना (Mine Plan) तील अटी व शर्तीप्रमाणे खनन कार्य व मालवाहतुक करण्यात येईल. संभाव्य पर्यायी रस्त्याकरीत सर्व्हे करण्यात येईल. तसेच खदानीच्या चारही बाजुला सुरक्षा कुंपन लावण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | कंपनीने आजपावेतो कोथुळना गावाला CER निधी दिलेला नाही. प्रस्तावित प्रकल्पामध्ये किती लोकांना रोजगार मिळणार आहे. याची माहिती स्थानिकांना लिखीत स्वरूपात देण्यात यावी. परिसरातील गावांचा विकास करण्याकरीता CER फंडचा उपयोग करावा. परिसरातील गावात आरोग्य शिबीर कंपनीने घेतलेले नाही. | CER निधीची माहिती लिखीत स्वरूपात देण्यात येईल. परिसरातील गावांचा विकास करण्याकरीता CER फंडचा उपयोग येईल. तसेच आरोग्य शिबीर, वृक्ष लागवड, रस्ते दुरूस्ती इ. सामाजिक कार्य करण्यात येईल. |
| ३ | प्रस्तावित प्रकल्पापासुन राष्ट्रीय उद्यान १० कि.मी. अंतरावर आहे, याची माहिती दयावी. | प्रस्तावित प्रकल्पापासुन राष्ट्रीय उद्यान १० कि.मी. अंतरावर आहे, याची माहिती देण्यात येईल. |
| ४ | विद्यमान कंपनीने अंदाजे २०० फुटाचे खड्डे केलेले असुन जनावरांसाठी कठडे उभारलेले नाही व यामुळे वन्यजीवास धोका होवू शकतो. परिसरातील भूजल पातळी खाली गेलेली आहे. खोदकामातून निघालेली माती नाल्यामध्ये जाते. | खदानीच्या चारही बाजुला सुरक्षा कुंपन लावण्यात येईल. खोदकामातून निघालेली माती रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी वापरण्यात येईल व अतिरीक्त माती मंजुर आराखड्याप्रमाणे ठराविक जागेत साठविण्यात येईल. माती नाल्यामध्ये जाणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. भूजल पातळी वाढविण्याकरीता रेनवॉटर हर्व्हेस्टींग करण्यात येईल. |
| ५ | कोथुळना गावांत आदिवासी वास्तव्यास असुन कंपनीमार्फत सामाजिक बांधिलकीचा सर्व्हेक्षण केलेला नाही. | आरोग्य शिबीर, वृक्ष लागवड, रस्ते दुरूस्ती इ. सामाजिक कार्य गावांमध्ये करण्यात येईल. |
| ६ | विद्यमान खदानीमुळे परिसरातील शेतीला धुळीकणांमुळे नुकसान होत आहे. कंपनीने गावांत जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे. विस्तारीकरण प्रकल्पाला विरोध नाही. | धुळ नियंत्रणाकरीता रस्ते दुरूस्ती करण्यात येईल, रस्त्यावर पाण्याची फवारणी करण्यात येईल, वाहतुकीचे ट्रक ताडपत्रीने आच्छादित केली जातील, इ. उपाययोजना करण्यात येतील. |
| ७ | प्रस्तावित प्रकल्पामध्ये वृक्षलागवडीकरीता निधी तरतुद किती आहे? केवळ रू. ३ लक्ष प्रतीवर्ष वृक्षलागवडीकरीता व रू. ५०,०००/- प्रतीवर्ष वृक्ष संवर्धनाकरीता खर्च केली जातात, जे पर्याप्त नाही. परिसरात अजून वृक्ष लागवड करावी. | वृक्षलागवडीकरीता निधीची माहिती देण्यात येईल. वृक्षलागवडीकरीता पर्याप्त निधी वापरला जाईल. वृक्षलागवड विपुल प्रमाणात करण्यात येईल. |

**७) श्रीमती. जयश्री सोमकुवर, ग्रामस्थ**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कोथुळना गावांतील घरांना रात्री धुळीकणांचा त्रास होतो, अपघाताची शक्यता असल्यामुळे कंपनीने गावांतील रस्त्यावर पथदिवे लावावे. | खनन कार्य रात्रीच्या वेळी केले जाणार नाही. कंपनीद्वारे गावांतील रस्त्यावर पथदिवे लावण्यात येतील. |

८) श्री. गोविंदलाल विखे, ग्रामस्थ

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | धुळीकणांचा त्रास होतो, ब्लास्टींगमुळे गावांतील घरांवर दगड आले नाही पाहिजे. शाळेतील मुलांना जाणारा रस्ता हा झुडपी जंगलातुन जातो. गावांतील लोकांकरीता वेगळा रस्ता करून दयावा. | धुळ नियंत्रणाकरीता रस्ते दुरूस्ती करण्यात येईल, रस्त्यावर पाण्याची फवारणी करण्यात येईल, वाहतुकीचे ट्रक ताडपत्रीने आच्छादित केली जातील. ब्लास्टींग ही कमी शक्तीचे व नियंत्रीत पध्दतीने करण्यात येईल. वेगळ्या रस्त्याकरीता सर्व्हे करण्यात येईल. |

**श्री.उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जणसुनावणीसमिती.**

यांनी सांगितले की, प्रकल्पधारकाने संमतीप्रत्रातील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. सदर विस्तारीत प्रकल्प सुरू करण्याआधी जनतेच्या समस्या सोडविण्याकरीता केलेल्या मागण्या पुर्ण कराव्या व तद्‌नंतरच विस्तारीकरण करावे.

**मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा लोकसुनावणी समिती.**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी जास्तीत जास्त स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा, परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, अद्यावत प्रदूषण नियंत्रण व्यवस्था बसवावी याबाबत सूचना प्रकल्पधारकास केल्या.

उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (उमाशंकर भादुले) | (अशोक करे) | (विजया बनकर) |
| उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ व समन्वयक, लोक सुनावणी समिती | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती | अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा, लोक सुनावणी समिती |